# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक ३० मार्च, २०१७ / चैत्र ९, १९३९ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **शालेय शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्यांक विकास आणि वक्फ मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न आणि औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री** | |
| **(३)** | **पर्यावरण मंत्री** | |
| **(४)** | **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २७**

---

### डोळासणे (ता.संगमनेर,जि.अहमदनगर) येथे "मोंटो कार्लो" कंपनीच्या डांबर व खडी क्रशिंग प्रकल्पामुळे होणारे प्रदूषण

**(१) * ७६५९१ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोळासणे (ता.संगमनेर, जि.अहमदनगर) येथे "मोंटो कार्लो" कंपनीच्या डांबर व खडी क्रशिंग प्रकल्पामुळे, विविध प्रकारच्या मशिनरीमधील ऑईल गळतीमुळे होणारे प्रदूषण तसेच रात्रीच्या वेळी मशिनरी सुरु झाल्यानंतर आवाज व धूरामुळे प्रकल्पालगत असलेल्या आदिवासी सतेची वाडीतील ग्रामस्थांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याचे तसेच गावातील विहिरींचे पाणी काळे पडून काही पाणी साठयांवर काळया रंगाचा तेलकट तवंग पसरला असल्याचे दिनांक २४ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू वाडीतील आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनीची माती पूर्णपणे काळी पडून शेती पिकांवर त्याचा विपरित परिणाम झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी स्वातंत्र्यदिनी झालेल्या ग्रामसभेत सदर कंपनीवर कारवाई होण्यासाठी प्रांत अधिकारी, संगमनेर, तहसिलदार, ग.वि.अ.,पं.स. इत्यादीना निवेदन देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी उक्त विहिरीतील पाण्याचे नमुने तपासणीसाठी पाठविले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, व त्यात काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) दिनांक २३ डिसेंबर २०१६ रोजी स्थानिक वृत्तपत्रामध्ये याबाबतचे वृत्त प्रसिध्द् झाले होते, हे खरे आहे.

(२) हे खर नाही.

(३) ग्रामपंचायत हिवरगाव पठार यांचेकडील दिनांक ३ ऑगस्ट् २०१६ रोजीचे ठरावाची नक्कल प्रांत अधिकारी, तहसिलदार, गट विकास अधिकारी यांना सादर करण्यात आली होती, हे खरे आहे.

(४) हे खरे आहे.

(५) या अनुषंगाने तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, संगमनेर, प्राथमिक आरोग्य केंद्र, चंदनापूरी यांनी जागेवर भेट देऊन पाण्याची तपासणी केली असून भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेच्या अहवालानुसार सदरचे पाणी पिण्यायोग्य असलेबाबतचा अहवाल दिनांक २८.१२.२०१६ रोजी सादर केला आहे. तसेच पाणी गुणवत्ता, संनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रम, भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांनी येथील पाण्याची जैविक पूर्वतपासणी करुन सदरचे पाणी पिण्यायोग्य असलेबाबत दिनांक ३१.१२.२०१६ रोजीच्या अहवालात नमूद केले आहे.

-----------------

**दाटेगाव (जि. हिंगोली) येथे थकित पाणीपट्टीमुळे**
**पाणी पुरवठा बंद करण्यात आल्याबाबत**

**(२) * ८३८२८ श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दाटेगाव (जि. हिंगोली) येथील नळ योजनेच्या थकित पाणीपट्टीमुळे पाणी पुरवठा बंद करण्यात आला असल्याने पाण्याची समस्या निर्माण झाली असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त गावातील हातपंप व विहिरीचे दुषित पाणी प्यावे लागत असल्याने ग्रामस्थांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त ठिकाणी शुध्द व नियमित पाणीपुरवठा सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

थकित पाणी पट्टीमुळे नगर परिषद, हिंगोली यांनी दिनांक १०.०२.२०१७ रोजी दाटेगावचा पाणी पुरवठा बंद केला होता. ग्रामपंचायतीने रु.५०,०००/- पाणी पट्टी वसूल करुन भरणा केल्यामुळे दिनांक ०२.०३.२०१७ पासून पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे.

(२) नाही.

गावात योजना कार्यान्वित असल्यामुळे दुषित पाणी पिण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) ग्रामपंचायतीने पाणी पट्टी भरणा केल्यामुळे नगर परिषद, हिंगोली यांनी दिनांक ०२.०३.२०१७ पासून गावात नियमित पाणी पुरवठा सुरु केला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भुसावळ (जि.जळगाव) येथील बोगस शिधापत्रिकाप्रकरणी स्वस्त धान्य दुकानदारांवर कारवाई करण्याबाबत

**(३) * ८०९८८ श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ (जि.जळगांव) येथील ९ रास्त भाव दुकानांच्या अनियमिततेबाबत असलेल्या तक्रारींची चौकशी करण्याबाबतचे पत्र शासनाने विभागीय आयुक्त, नाशिक, जिल्हाधिकारी जळगाव यांना दिनांक १४ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बोगस शिधापत्रिका प्रकरणी शासनाने त्रिस्तरीय समिती नेमली होती व सदर समितीने आपला अहवाल शासनाकडे सादर केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त समिती अहवालामध्ये भुसावळ शहरातील ९ रास्त भाव दुकानदारांनी अनियमितता व गैरव्यवहार केला असल्याची बाब स्पष्ट झाली असताना देखील समिती सदस्य असलेल्या जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी रास्त भाव दुकानदारांवर कोणतीही कारवाई केली नसल्याची तक्रार मूळ तक्रारदार यांनी शासनाकडे केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी विभागीय आयुक्त यांनी दिनांक १७ सप्टेंबर, २०१६ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी जळगाव यांना कार्यवाहीसाठी आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबधितावंर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) होय, हे खरे आहे.

तथापि, विभागीय आयुक्त, नाशिक यांनी दिनांक १७.०९.२०१६ रोजी सादर केलेला अहवाल शासनाने स्विकारला असून अहवालात नमूद दोषी असलेल्या दुकानदारांवर कार्यवाही करण्यासाठी दिनांक ०३.१२.२०१६ व दिनांक १४.०२.२०१७ च्या पत्रान्वये विभागीय आयुक्त, नाशिक व जिल्हाधिकारी, जळगांव यांना कळविले आहे.

(५) ९ रास्त भाव दुकांनापैकी २ दुकानांचा परवाना रद्द करण्यात आला आहे. उर्वरित दुकानांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे. तसेच या प्रकरणी जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द विभागीय चौकशीच्या प्रस्तावावर शासन स्तरावर कारवाई सुरु आहे.

-----------------

**राज्यातील ४९ नदया प्रदूषित असल्याबाबत**

**(४) * ७४९१८ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ४९ नदया अत्यंत प्रदूषित असल्याचे केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अभ्यासातून प्रकाशित करण्यात आलेल्या अहवालामध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील अतिक्रमण आणि प्रदूषित झालेल्या नद्यांच्या पुनरुज्जीवनासाठी नदी प्राधिकरण स्थापन करण्याची आवश्यकता असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर नदया प्रदूषणमुक्त करण्यासाठी त्वरित उपाययोजना न केल्यास नागरिकांचे भवितव्य धोक्यात येवू शकते असा इशारा पर्यावरण तज्ज्ञांनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यामध्ये कोणकोणत्या नद्या प्रदुषित आहेत व सदर नद्यांच्या प्रदूषणमुक्तीसाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) होय

(२) होय. तथापि, शासनाकडे निवेदन प्राप्त नाही.

(३) व (४) राज्यातील नद्यांच्या सर्वेक्षणावरुन ४९ प्रदूषित पट्टे आढळून आले आहेत व त्यावरील प्रदूषण कमी करण्यासाठी पुढील प्रमाणे उपाय योजना करण्यात येत आहेत.

अ) राष्ट्रीय नदी कृती योजना व राज्य नदी कृती योजना राबविण्यात येत आहे.

ब) प्रदूषण नियंत्रण मंडळाने उदयोगांना विनाप्रक्रिया सांडपाण्याचा विसर्ग करण्यास बंदी घातलेली असून उदयोगातून निर्मित होणा-या सांडपाण्यावर प्रक्रिया करून प्रक्रियाकृत सांडपाणी बाहेर सोडण्याचे निर्देश दिलेले आहेत.

क) राज्यातील महानगरपालिका व नगरपालिका यांना सांडपाणी व नागरी घनकचरा व्यवस्थापनाबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

ड) सद्यस्थितीत ४९ पट्टयांपैकी १३ पट्टे प्रदूषित पट्टे म्हणून गणले जात नाही.

इ) राज्यात दिनांक १२ ऑगस्ट, २०१६ च्या शासन निर्णयान्वये नमामि चंद्रभागा प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

**हिंगोणी (ता. नेवासा, जि. अहमदनगर) येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील विद्‍यार्थीनींवर होत असलेला अत्याचार**

**(५) * ८३६९७ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोणी (ता.नेवासा, जि.अहमदनगर) येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील शिक्षक इयत्ता तिसरी व चौथीमध्ये शिकणाऱ्या नऊ मुलींना नापास करण्याची धमकी देऊन गत सहा महिन्यांपासून त्यांचे लैंगिक शोषण करीत असल्याची बाब दिनांक २२ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गंभीर प्रकरणाची पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करून देखील अद्‍याप कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील अनेक शाळेमध्ये विद्‍यार्थीनींचे लैंगिक शोषण होत असल्याच्या घटना वारंवार घडत असल्याने शासनाने या प्रकरणाची चौकशी करुन त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) नाही.

जिल्हा परिषदे मार्फत फक्कड नारायण शिंदे, प्राथमिक शिक्षक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हिंगोणी, ता. नेवासा याचे विरुध्द शनि शिंगनापूर पोलिस स्टेशन येथे दिनांक २१/२/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपीस अटक करण्यात आलेली आहे. तसेच सदर प्रकरणी फक्कड नारायण शिंदे यास दिनांक २२/२/२०१७ रोजी सेवा निलंबित करण्यात आलेले असून विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

(३) विभागाच्या क्र.प्राशिधो २०१३/प्र.क्र.२४/प्राशि-१, दि.२२/२/२०१३ च्या शासन परिपत्रकान्वये बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षणाचा अधिनियम २०१२ यातील तरतूदीची अमंलबजावणी राज्यातील प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळांमध्ये करणे बाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

तसेच शासन परिपत्रक दि.४ ऑक्टोबर, २०१६ अन्वये शाळेतील विद्यार्थ्यांवरील होणा-या अत्याचाराची तक्रार दाखल करण्याबाबत, POCSO e-Box या राष्ट्रीय बालअधिकार संरक्षण आयोगाने तयार केलेल्या सुविधेबाबतची माहिती सर्व शाळांमधील मुख्याध्यापक व शिक्षकांनी सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्याची सूचना देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बुलढाणा जिल्हयातील शासकीय गोदामातील धान्याची अवैधरित्या होत असलेली विक्री**

**(६) * ८३११४ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर (जि.बुलढाणा) येथे पुरवठा विभागाने दिनांक ३१ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास अवैध साठा करून ठेवलेल्या १६६ तांदळाची पोती हस्तगत केली, हे ही खरे आहे काय,

(२) तसेच बुलढाणा जिल्ह्यातील अत्योंदय योजनेचे शासकीय गोदामातील धान्य खुल्या बाजारात विक्रीकरीता नेले जात असताना पुरवठा विभागाने हस्तगत केल्याच्या सहा घटना मागील पाच महिन्यात घडल्या असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बुलढाणा जिल्ह्यात प्रशासनाच्या अकार्यक्षमता व हलगर्जीपणामुळे उक्त घटना वाढत असल्याने लाभार्थी शासकीय अन्न धान्यापासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले, त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) मेहकर जि.बुलढाणा येथील मौजे राजगड येथे दि.३१.०१.२०१७ रोजी १६६ तांदुळाची पोती हस्तगत करण्यात आली आहेत. सदर जप्त केलेला तांदूळ सार्वजनिक वितरण प्रणालीचा आहे किंवा कसे याबाबत परिक्षण करण्याकरीता धान्याचे नमुने फुड टेस्टिंग लॅब, अमरावती येथे सादर केले आहेत. त्याबाबतचा अहवाल अद्यापि अप्राप्त आहे.
(२), (३) व (४) बुलढाणा जिल्हयात सार्वजनिक वितरण प्रणालीचे धान्य खुल्या बाजारात विक्री करण्यासंदर्भात सन २०१६ ते सन २०१७ फेब्रुवारी अखेर पर्यंत एकूण ७ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सदर गुन्हयांमध्ये ७ स्वस्त धान्य दुकानदारांचा समावेश आहे. या स्वस्त धान्य दुकानदारांपैकी ३ स्वस्त धान्य दुकानदारांचे प्राधिकारपत्र रद्द करण्यात आले असून एका स्वस्त धान्य दुकानदाराचे प्राधिकारपत्र निलंबित करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**आरसीएफ थळ (ता.अलिबाग, जि.रायगड) कंपनीतील प्रदूषित सांडपाणी समुद्रात वाहून नेणाऱ्या पाईपलाईनबाबत**

**(७) * ७६५४९ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आरसीएफ थळ (ता.अलिबाग, जि.रायगड) कंपनीतील प्रदुषित सांडपाणी खोल

समुद्रात वाहून नेणारी पाईपलाईन नवगाव बंदरातून टाकण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरसीएफ थळ कंपनीतील प्रदूषित सांडपाणी वाहून नेणारी पाईपलाईन ही वर आली असल्याने बंदरात ये-जा करणाऱ्या मच्छिमार बोटींसाठी अडथळा निर्माण होत असल्याने अनेक वेळा या पाईपलाईनवर बोटी आदळून बोटींचे लाखो रूपयांचे नुकसान झाल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित कंपनीविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) होय.

(२) दि. १४.०१.२०१७ रोजीच्या कृषीवल दैनिकामध्ये अशा आशयाची बातमी प्रसिध्द झाली होती.

(३) मे. आरसीएफ उद्योगास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत कारणे दाखवा नोटीस दि. १७/०१/२०१७ रोजी देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गोंदिया जिल्हयातील धान विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांना अनुदानाची रक्कम वितरीत करण्याबाबत

**(८) * ८०४३५ श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया येथील आदिवासी विकास महामंडळ व जिल्हा मार्केटिंग फेडरेशन यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या धान खरेदीसाठी १०० केंद्रे सुरू करून राज्य शासनाने धानाला १४७० रुपये प्रति क्विंटलचा हमी भाव घोषित केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने धान विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांना दरवर्षी ठरवलेली संशोधन कर प्रति क्विंटल २०० रुपये बोनस अनुदानाची रक्कम वितरीत करण्याचा निर्णय घेऊन ५० क्विंटल पेक्षा जास्त धान विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांची रक्कम रद्द केली असल्याने लाभार्थी या योजनेपासून वंचित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय.
(२) राज्य शासनाने किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत खरीप पणन हंगाम २०१६-१७ मध्ये धान विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांना केंद्र शासनाने निश्चित केलेल्या दराव्यतिरिक्त प्रति क्विंटल २०० रुपये प्रति शेतकरी ५० क्विंटल च्या मर्यादेपर्यंत प्रोत्साहनपर राशी मंजूर केलेली आहे. ही राशी संशोधन कर नसून प्रोत्साहनपर राशी आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील १६० गावपाड्यांवर कायम स्वरूपी पाणी पुरवठा योजना लागू करण्याबाबत

**(९) * ८२९२८ श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील १६० गावपाड्यांवर मागील ८ वर्षांपासून तीव्र पाणी टंचाई भासत असून सदरहू तालुक्यातील टंचाईग्रस्त भागात टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी गेल्या ८ वर्षात सव्वा तीन कोटी रूपये खर्च करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावर्षीही सदरहू १६० गावपाडयांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागणार असून त्यासाठी किमान रुपये १ कोटी खर्च अपेक्षित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहापूर तालुक्यात जलाशयाचे मोठे साठे असतानाही दरवर्षी फेब्रुवारीनंतर विहिरी आटत असल्याने पाण्याचे दुर्भिक्ष निर्माण होवून दुर्गम भागातील महिलांना पाण्यासाठी भटकावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त तालुक्यातील सदरहू १६० गावपाड्यांमध्ये कायमस्वरूपी नळपाणी पुरवठा योजना लागू करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) सन २००९ ते सन २०१६ पर्यंत शहापूर तालुक्यातील टंचाईग्रस्त गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याकरिता रुपये ३.४४ कोटी इतका खर्च करण्यात आला आहे.

(२) अंशत: खरे आहे.

शहापुर तालुक्यामध्ये एकूण ३२ गावे व ११७ पाडयांना टँकरने पाणी पुरवठा करणे प्रस्तावित असून त्यासाठी रुपये ६०.०० लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे.

(३) अंशत: खरे आहे,

शहापुर तालुक्यातील टँकरग्रस्त गांवे / पाडे उंच ठिकाणी वसलेले असुन या गावात उपलब्ध असलेले पाण्याचे स्त्रोत यांची भुजल पातळी लवकर खालावते व या भागात सर्वत्र अग्निजन्य खडक असल्यामुळे पाणी साठवण क्षमता कमी आहे. त्यामुळे या ठिकाणी पाणी टंचाई भासते.

(४) शहापूर तालुक्यातील १२२ टँकरग्रस्त गांवे / पाडे यापैकी ५३ गांवे / पाडे येथे नळ पाणी पुरवठा योजनाची कामे प्रगतीपथावर आहेत.

२१ गांवे / पाडे येथे जलयुक्त शिवार अभियाना अंतर्गत साधी विहीर खोलीकरणांची व जलकुंभ घेणे ही कामे सुरु आहेत.

तसेच शहापूर तालुक्यातील पाणीटंचाई कायमस्वरुपी दूर करण्याच्या दृष्टीने ९७ गावे व २५९ पाडे समाविष्ट असलेली भावली धरणावरुन गुरुत्वाकर्षणाने पाणी पुरवठा करणारी योजना प्रस्तावित असून योजनेस मंजूरी देण्याच्या अनुषंगाने आवश्यक बाबींची पूर्तता करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात स्टेंटच्या किंमतीवर नियंत्रण ठेवण्याबाबत**

**(१०) * ७९६८४ श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात स्टेंटचा समावेश अत्यावश्यक औषधांमध्ये करण्याचे प्रयत्न सुरु असतांना स्टेंटच्या व्यवसायात २७० ते एक हजार टक्के नफा कमावला जात असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्टेंटच्या उत्पादकांपेक्षा रुग्णालयाच्या पातळीवर सर्वाधिक नफा कमविला जात असल्याचे नॅशनल फार्मास्युटिकल प्राइसिंग ॲथोरिटीने नमुद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्टेंटच्या उत्पादनावरील खर्चाच्या आधारे त्याची किंमत ठरविली गेली तर रुग्णांना अधिक फायदा होईल, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, स्टेंटच्या किंमतीवर नियंत्रण ठेवण्याबाबत राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हृदयरोगावरील उपचारासाठी वापरण्यात येणा-या स्टेंटची किंमत जास्त आकारली जात असल्याची बाब प्रशासनाच्या निदर्शनास आल्यावर प्रशासनातर्फे करण्यात आलेल्या तपासणीत खालील बाबी आढळून आल्या

१) कार्डीयाक स्टेंटची कमाल किंमत ही आयात किंमतीपेक्षा ३०० ते ७०० टक्के अधिक आकारली जाते.

२) आयातदारास सुमारे १२० % फायदा होतो.

३) घाऊक विक्रेत्यांना सरासरी १२० % फायदा होतो.

४) रूग्णांलयाचा फायदा हा सुमारे २५ % असल्याचे आढळले.

(२) स्टेंटच्या उत्पादकापेक्षा रूग्णालयाच्या पातळीवर सर्वाधिक नफा कमविला जात आहे, असे नॅशनल फार्मास्युटिकल प्राइसिंग ॲथोरिटीने नमुद केल्याची बाब अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आलेली नाही.

(३) होय, हे खरे आहे.

(४) केंद्र शासनाने त्यांच्या दि. १३ फेब्रुवारी, २०१७ च्या आदेशान्वये कार्डियाक स्टेंटच्या किमतीवर नियंत्रण आणले आहे. अन्न व औषध प्रशासनाकडून त्यानुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कुरखेडा (ता.शेगाव,जि.बुलढाणा) येथील विहीरी व बोअरचे भूगर्भातील पाणी क्षारयुक्त असल्याबाबत

**(११) * ७७९३९ श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुरखेडा (ता.शेगाव,जि.बुलढाणा) साडेसहाशे लोकवस्ती असलेल्या गावात गोडया पाण्याचे स्त्रोत उपलब्ध नसल्याने विहीरी व बोअरचे भूगर्भातील क्षारयुक्त पाणी प्यायल्यामुळे गत वर्षी तीन व या वर्षात दोन जणांचा किडणी विकारामुळे मृत्यू झाला असून सध्या आठ जण किडणी विकारग्रस्त असून त्यांच्यावर औषधोपचार सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गावात क्षारयुक्त पाण्यामुळे पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली असल्याने शासनाने याबाबत चौकशी करुन आर.ओ.प्लॅन्ट लावण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे.

कुरखेडा गावामध्ये आरोग्य विभागामार्फत केलेल्या सर्वेक्षणानुसार जानेवारी २०१५ ते फेब्रुवारी २०१७ मध्ये किडनीच्या आजाराचे ११ रुग्ण आढळून आले व त्यापैकी एका रुग्णाचा मृत्यु झाला आहे. आढळलेले किडनी रुग्ण व मृत्यू हे क्षारयुक्त पाणी पिल्यानेच झाले आहेत असे निश्चितपणे सांगता येत नाही.

(२) सदर गावाच्या मागणीनुसार नोव्हेंबर, २०१६ मध्ये तातडीने सर्वेक्षण करुन, पाणी टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत खाजगी विहिर अधिग्रहित करुन तात्पुरती पुरक योजना आखण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**आष्टी व ६४ गावे (ता. आष्टी, जि. बीड) या प्रादेशिक योजनेतील सर्व गावांसाठी नळपाणी पुरवठा योजनेसाठी निधी उपलब्ध होण्याबाबत**

**(१२) * ७९२४६ ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) : दिनांक १३ एप्रिल, २०१६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक १०० मधील अतारांकित प्रश्न क्रमांक ३८७६३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी व ६४ गावे (ता. आष्टी, जि. बीड) या प्रादेशिक योजनेतील सर्व गावांसाठी सीना धरणातून नळपाणी पुरवठा योजना आखण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बीड यांनी रु.१२८ कोटी ढोबळ किंमतीचे अंदाजपत्रक तयार केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेच्या प्राकलन, आराखडे व सर्वेक्षणासाठी रु. ६३ लक्ष रकमेची मागणी जिल्हा परिषद, बीड यांनी शासनाकडे केली असून सदर मागणीला एक वर्षाहून अधिक कालावधी होऊनही अद्याप निधी उपलब्ध करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने जिल्हा परिषद, बीड यांना तातडीने आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) शासनाने संपूर्ण मराठवाडा विभागासाठी ग्रिड पध्दतीने पाणी पुरवठा योजना राबविण्यासाठी व्यवहार्यता तपासण्यासाठी दि.०६.१२.२०१६ रोजी समितीची स्थापना केली असून त्या समितीच्या मार्गदर्शक तत्वानुसार व आदेशानुसार सदर योजना प्रस्तावित करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला येथे औषधी प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांनी भेसळयुक्त तेलाचा साठा जप्त केल्याबाबत

**(१३) * ८३८७६ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला एम.आय.डी.सी फेज ४ मध्ये अन्न व औषधी प्रशासन विभागाच्या अन्न सुरक्षा अधिकारी यांनी दिनांक १६ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास छापा मारून लाखो रुपयांचा भेसळयुक्त तेलाचा साठा जप्त केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त छाप्यामध्ये सोयाबिन तेलात मोठ्या प्रमाणात भेसळ आढळून आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) दि. १६/०२/२०१७ रोजी अन्न व औषध प्रशासनाव्दारे अकोला एम.आय.डी.सी फेज ४ येथे छापा टाकून त्या ठिकाणाहून भेसळीच्या संशयावरून रू. २,७५,६६४ किंमतीचा सोयाबीन तेलाचा साठा जप्त करण्यात आला.
(२) छाप्यादरम्यान भेसळीच्या संशयावरून जप्त करण्यात आलेल्या सोयाबिन तेलाच्या साठ्यातील तेलाचे नमुने विश्लेषणासाठी दि. १७/०२/२०१७ रोजी पाठविण्यात आले असून, त्यांचा विश्लेषण अहवाल प्रलंबित आहे.

(३) विश्लेषण अहवाल प्राप्त झाल्यावर नियमानुसार पुढील कार्यवाही घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे शहरातील शाळांमध्ये सी.सी.टी.व्ही बसविण्याबाबत

**(१४) * ८२१७६ श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शाळांमध्ये अल्पवयीन मुलांवरील लैंगिक अत्याचाराचे प्रमाण वाढले असून याची मा.उच्च न्यायालयाने दखल घेत शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे बंधनकारक करा अशा सूचना दिल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पुणे शहरातील ३१० शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याबाबत महापालिकेने मागील वर्षापासून वारंवार पाठपुरावा करुनही शासनाने कोणतीच कार्यवाही केली नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, असल्यास त्यानुसार पुणे शहरातील उक्त ३१० शाळांमधील एक लाखाहून अधिक विद्यार्थी आणि विद्यार्थीनींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सीसीटीव्ही बसविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याबाबत विचार करावा अशी सूचना मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी केली हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) पुणे शहरातील महानगरपालिकेच्या शाळेमध्ये सीसीटीव्ही बसविण्याबाबत कार्यवाही पुणे महानगरपालिकेकडून होत असून खाजगी शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याबाबत कार्यवाही शाळा व्यवस्थापनाकडून होत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**एमआयडीसी राजेगांव (गडेगांव) (जि. भंडारा) येथील चरम बायो एनर्जी कारखान्यातील प्रदुषणांमुळे शेतकऱ्यांचे पीक नष्ट होत असल्याबाबत**

**(१५) * ८१८०१ श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यातील एमआयडीसी राजेगांव (गडेगांव) येथे चरम बायो एनर्जी कारखान्यातून वाहणारे रसायनयुक्त सांडपाणी व धुळीचे कणामुळे लगतच्या शेतजमीनीवर उत्पादीत होणारी पिके संपुर्ण नष्ट होत असल्याची तक्रार जिल्हा प्रशासनाकडे करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त कारखान्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) होय.

(२) दि. २९/१२/२०१६ रोजी सदर उद्योगास अंतरिम निर्देश देण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईसह ठाण्यातील तेलमाफीयांकडून प्रतिमाह साडेचार कोटी रुपयांचा रॉकेलचा होत असलेला गैरव्यवहार**

**(१६) * ७८३७७ श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह ठाण्यातील तेलमाफीयांकडून दरमहा सुमारे साडेचार कोटींचा रॉकेलचा गैरव्यवहार होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने मुंबईसह ठाण्यातील रेशनदुकानांवर होणा-या रॉकेलचा काळाबाजार रोखण्यासाठी तसेच काळा बाजार करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वणी (जि.यवतमाळ) तालुक्यातील गावांमध्ये निर्माण झालेली पाणी टंचाई

**(१७) * ८४०८७ ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भुरकी, पोहणा, डोर्ली, कळमना, कुर्ली, मानकी, नायगाव, नांदेपेरा, पळसोनी (ता.वणी,जि.यवतमाळ) इ. गावांमध्ये पाणी टंचाई असून तेथे दुषित पाण्याचा पुरवठा केला जातो, हे खरे आहे काय,
(२) तसेच उक्त गावांतील पाणी पुरवठा योजनेमध्ये गैरव्यवहार झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच उक्त गावामध्ये शुध्द पाणी पुरवठा करण्याबाबत व पाणीटंचाई दूर करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पिंपळोली (ता.कर्जत,जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीतील अन्थ्राट काळयाची वाडी येथे कायमस्वरुपी पाणी योजना सुरु करण्याबाबत**

**(१८) * ७९३६८ श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळोली (ता.कर्जत,जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीतील अन्थ्राट काळयाची वाडी येथील ग्रामस्थांना दरवर्षी जानेवारी महिन्यांपासूनच पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष भासत असून कायमस्वरुपी पाणी योजना सुरु करावी अशी मागणी निवेदनाद्वारे तहसिलदार यांना दिनांक २९ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणच्या ग्रामस्थांनी मागील २५ वर्षापासून सातत्याने कायमस्वरूपी नळपाणी पाणीपुरवठा योजना लागू करण्यात यावी म्हणून मा. मुख्यमंत्री, मा.पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री, मा.पालकमंत्री, रायगड जिल्हा, जिल्हाधिकारी, रायगड, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, रायगड आदींकडे निवेदनाद्वारे प्रत्यक्ष भेट घेवून तसेच आंदोलनाचा मार्ग अवलंबून शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू मागणीबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त ग्रामस्थांना कायमस्वरूपी पाणी पुरवठा होण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, अंशत: खरे आहे. पिंपळोली ग्रामपंचायतीमधील काळ्याची वाडी यांचे निवेदन तहसिल कार्यालयात दिनांक ९ मे, २०१६ रोजी प्राप्त झाले होते. सदर निवदेनाच्या अनुषंगाने दिनांक १९.०५.२०१६ ते दिनांक २६.०६.२०१६ या कालावधीत टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला आहे.

(२) होय, मागणी केली आहे. तथापि आंदोलन केलेले नाही.

(३) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत सन २०१७-१८ च्या कृती आराखड्यात पिंपळोली (ता.कर्जत, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीतील अन्थ्राट काळयाची वाडीचा समावेश करण्याची कार्यवाही जिल्हा परिषद स्तरावर करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रबाळे, नवी मुंबई येथील मे.संजीवनी पॅरेन्टल या कारखान्याने इंजेक्शनची विना चाचणी केलेली विक्री**

**(१९) * ७६०२२ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमित देशमुख (लातूर शहर):** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील रबाळे येथील मे.संजीवनी पॅरेन्टल या इंजेक्शन बनविणाऱ्या कारखान्याने इंजेक्शनची चाचणी न घेताच, कच्च्या मालाची तपासणी झाली नसतानाही उक्त इंजेक्शनची विक्री केल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान अन्न व औषध प्रशासनाच्या गुप्तवार्ता विभागाच्या निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उत्पादनासाठी असलेल्या कच्च्या मालाची चाचणी पूर्ण होण्याअगोदरच औषधांच्या उत्पादनाची प्रक्रिया सुरु करुन, कच्च्या मालाबाबत खातरजमा झालेली नसतानाही औषधांच्या बॅचसाठी त्याचा वापर केल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) अन्न व औषध प्रशासनाव्दारे दि. २३ नोव्हेंबर ते २५ नोव्हेंबर, २०१६ या कालावधीत मे. संजीवनी पॅरेन्टल, रबाळे, नवी मुंबई या इंजेक्शन उत्पादन करणा-या पेढीची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान पेढीने इंजेक्शन उत्पादनासाठी लागणा-या पुरक घटकांची संपूर्ण चाचणी न घेताच त्याचा वापर इंजेक्शन उत्पादनासाठी करीत असल्याचा तसेच उत्पादन केलेल्या इंजेक्शनची सुध्दा पुर्ण चाचणी न करता विक्री/ वितरण केल्याचे निदर्शनास आले आहे,

(३) तपासणीदरम्यान पेढीत आढळून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगे पेढीस कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच पेढीतून ०४ औषध नमुने विश्लेषणासाठी पाठविण्यात आले असुन त्यांचा अहवाल प्रलंबित आहे.

पेढीमालकास बजावण्यात आलेल्या कारणे दाखवा नोटीसचे स्पष्टीकरण व विश्लेषणासाठी पाठविण्यात आलेले नमुन्यांचे अहवाल विचारात घेऊन नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**परसोडी (ता. बाभुळगाव,जि.यवतमाळ) येथील पाणी पुरवठा योजनेचे काम अपूर्ण असल्याबाबत**

**(२०) * ८१७६९ डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परसोडी (ता. बाभुळगाव, जि.यवतमाळ) येथे भारत निर्माण योजने अंतर्गत मंजूर पाणी पुरवठा योजनेमध्ये विहीर, पाईप लाईन, मोटर पंप व सिमेंट टाकीचे बाधंकाम अशा प्रकारची कामे घेण्यात आली असून सदर कामांमध्ये टाकीचे काम अपूर्ण असल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेतील मंजुर टाकीचे काम सबंधित अधिका-यांच्या निष्काळजीपणामुळे गत दोन वर्षा पासून अपूर्ण असल्याबाबतचे निवेदन नागरिकांनी दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त टाकीचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय.
(३) व (४) सदर योजनेचे काम ग्राम आरोग्य पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समितीमार्फत करण्यात आले असून, उंच टाकीचे काम तसेच किरकोळ कामे वगळता योजनेची कामे पुर्ण करण्यात आली आहे.

समितीमार्फत उंच टाकीचे काम व इतर कामे संथ गतीने सुरु असल्याने समितीला वारंवार सूचना देण्यात आल्या. तथापि, सदर कामे समितीमार्फत अद्यापही करण्यात आली नसल्याने, अस्तित्वातील ग्राम आरोग्य व पाणी पुरवठा समिती बरखास्त करुन नव्याने समिती गठीत करण्यात आली असून, सदर समितीकडे प्रभार हस्तांतरीत झाल्यानंतर त्वरीत योजनेची कामे पूर्ण करण्यात येतील.

-----------------

## तलासरी (जि.ठाणे) येथील ज्ञानमाता आदिवासी या शाळेतील फादर जेकब मुलींशी गैरवर्तन करीत असल्याबाबत

**(२१) * ७४१९६ श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु.पो.ता.तलासरी (जि.ठाणे) येथील ज्ञानमाता सदन शैक्षणिक संस्थेच्या ज्ञानमाता आदिवासी विद्यामंदिर या शाळेमध्ये दिनांक ९ डिसेंबर, २०१५ रोजी फादर जेकब हे काही आदिवासी मुलींशी अश्लिल वर्तन करीत असल्याचे शाळेतील शिक्षिकांना आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षिकांनी पिडीत विद्यार्थीनींनी दिलेला जबाब नोंदवून तसेच अन्य विद्यार्थीनींकडून अशा प्रकारची माहिती घेऊन त्यानुसार महिला दक्षता समिती सभा घेवून अहवाल तयार करुन शाळा संचालक व मुख्याध्यापक यांना देऊनही संबंधित फादरविरुध्द कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याची बाब दिनांक ५ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यानुसार फादर जेकब व शाळेच्या संचालक, मुख्याध्यापकांविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) होय.

(३) दिनांक ५/१२/२०१६ रोजी मुख्य संस्था संचालक श्री.फादर वेंडेन डीक्रुझा यांना ग्रामस्थांच्या तक्रारीनुसार पोलिसांनी अटक केली होती. सद्यस्थितीत हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुरूड-जंजिरा (जि.रायगड) येथील समुद्रातील प्रदूषणामध्ये झालेली वाढ

**(२२) * ७८६३० श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरूड-जंजिरा (जि.रायगड) समुद्र किना-यावरील खारफुटी नष्ट होत असून झपाटयाने वाढणा-या शहरीकरण व औद्योगिकीकरणामुळे तसेच कोणतीही प्रक्रिया न करता मोठया प्रमाणात दुषित पाणी समुद्रात सोडले जात असल्याने होणा-या प्रदुषणामुळे दोनशे प्राणी प्रजातीवर दुष्परिणाम होत असून दरवर्षी दहा लाख सागरी पक्षी नष्ट होत असल्याचे शास्त्रज्ञांच्या विशेष पाहणी सर्वेक्षणानुसार निदर्शनास आले असल्याचे माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी समुद्रातील प्रदुषणाच्या वाढत्या प्रमाणामुळे मासे मृत्यूमुखी पडत असून मासे खाणा-या नागरिकांच्या आरोग्यावरही विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने सागरी जीवनसृष्टीवर होणारा विपरीत परिणाम रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूरातील विभागीय क्रीडा संकुलाचे काम अपुर्ण असल्याबाबत

**(२३) * ७८५२४ श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूरातील विभागीय क्रीडा संकुलाचे काम सन २००९ मध्ये सुरु करुनही अद्यापपर्यंत या संकुलाचे काम पूर्ण झाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या क्रिडा संकुलाचे काम अपूर्ण असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, शासनाने या क्रिडा संकुलाचे काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) क्रीडा संकुलासाठी प्राप्त जागा ही दलदलीची असल्याने इमारतीचा पाया खूप खोलवर घ्यावा लागला. त्यामुळे बांधकाम चालू करण्यासाठी बराचसा कालावधी गेल्यामुळे संकुलातील क्रीडा सुविधा विहित वेळेत पूर्ण होऊ शकल्या नाहीत.

(३) दिनांक १८ मार्च, २०१७ रोजी संपन्न झालेल्या विभागीय क्रीडा संकुल समितीच्या बैठकीत विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष, विभागीय क्रीडा संकुल समिती यांनी कंत्राटदारास उर्वरित अपूर्ण कामे सुरु करण्याचे आदेश दिलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे गुढे-चांगतळे (ता. चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील पिण्याच्या पाण्याची समस्या सोडविण्याबाबत

**(२४) * ८३९४३ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गुढे-चांगतळे (ता. चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील विहिर सन २०१६ च्या अतिवृष्टीमध्ये कोसळली असल्यामुळे या भागात पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष निर्माण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी नव्याने विहिर बांधण्यासाठी शासनाने निधी उपलब्ध करून दयावा, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १७ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचेकडे पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पत्राच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सद्यस्थितीत पंचायत स्तरावर सदर नळपाणी पुरवठा योजनेच्या विहीरीतील गाळ व ढासळलेले साहित्य काढून तात्पुरत्या स्वरुपात पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे. तसेच रु.६.०० लाख इतक्या रकमेचे विहिर पुनर्बांधणीचे अंदाजपत्रक जिल्हा परिषदेने तयार केले असून अतिवृष्टीचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बालचित्रवाणी मधील ३० कर्मचाऱ्यांचे ३३ महिन्यांपासून**
**वेतन थकीत असल्याबाबत**

**(२५) * ८२१९७ श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील बालचित्रवाणीचे सुमारे ३० कर्मचाऱ्यांचे मागील ३३ महिन्यांपासून वेतन थकित असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षण विभागातील विविध आस्थापनातील कर्मचारी मुलाखती, व्हिडिओ तयार करून बालचित्रवाणीमधील संस्थेचा खर्च भागवत असून कर्मचाऱ्याना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गत चार महिन्यांपूर्वी मा.शालेय शिक्षण मंत्री यांनी बालचित्रवाणी बालभारतीमध्ये विलीनीकरण करणार असल्याची घोषणा केली असून अद्यापही शिक्षण विभागातील संबधित अधिकाऱ्यांना विलीनीकरणाबाबत कोणत्याही सूचना देण्यात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत चौकशी करुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अशंत: खरे आहे.
(२) अशंत: खरे आहे.
(३) नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वाघोली (ता.हवेली, जि.पूणे) येथे दगडखाण कामगारांच्या मुलांची पाषाण शाळा बंद करण्यात आल्याबाबत**

**(२६) * ७६०२९ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाघोली (ता.हवेली, जि.पुणे) येथे दगडखाण कामगार वारंवार विस्थापित होत असल्याने त्यांच्या मुलांना शिक्षणापासून वंचित रहावे लागू नये याकरिता संतुलन या सामाजिक संस्थेने सन १९७७ मध्ये दगडखाण कामगारांच्या मुलांसाठी पहिली पाषाण शाळा सुरु केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या शाळांचा मोठ्या प्रमाणावर विस्तार होऊन, सातारा, सांगली, कोल्हापूर, अहमदनगर, नाशिक, बीड, परभणी, लातूर, उस्मानाबाद, हिंगोली, सोलापूर, जळगाव, धुळे आणि यवतमाळ या ठिकाणी असलेल्या पाषण शाळेत ३० हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या शाळांना कायम स्वरुपी मान्यता देण्यासाठी माहे डिसेंबर, २०१२ मध्ये वा त्या दरम्यान राज्याच्या शिक्षण सचिवांच्या अध्यक्षतेखालील नियुक्त केलेल्या नऊ सदस्यांच्या समितीची गत चार वर्षात एकही बैठक न

होता, गोरगरिब आणि वंचित घटकांच्या मुलांसाठी शैक्षणिक व्यासपीठ ठरलेल्या पाषाण शाळा माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान बंद केल्याने ३० हजार विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पाषाण शाळा बंद करण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, उक्त शाळा बंद केल्यामुळे या शाळांतील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची पर्यायी व्यवस्था करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) या संदर्भातील अभिलेख उपलब्ध नाही.
(२), (३), (४) व (५) नाही.

राज्यात पुणे, सांगली, सातारा, नाशिक व कोल्हापूर या जिल्हयांमध्ये सदर संस्थेची १२ केंद्रे सुरु होती. या १२ केंद्रातील एकूण पटसंख्या ४९१ इतकी असून सर्वेक्षण घेतलेल्या दिवशी २२८ विद्यार्थी उपस्थित होते.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम,२००९ नुसार वाड्या, वस्त्या, तांडे व दगडखाण यातील सर्व मुले नियमित शाळेत दाखल होणे अपरिहार्य आहे. त्यानुषंगाने केंद्र शासनाने नाविन्यपूर्ण पर्यायी केंद्रास परवानगी दिलेली नाही. त्यामुळे अशा शाळेतील मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था त्यांना शासनस्तरावरुन वाहतूकीची सोय उपलब्ध करुन नियमित शाळेत करण्यात आली आहे.

-----------------

**मौजे कापसाळ (ता. चिपळूण,जि.रत्नागिरी) या गावाला निमशहरी (पेरी अर्बन) भागात समाविष्ट करून नव्याने नळपाणीपुरवठा योजना राबविणेबाबत**

**(२७) * ८३९४६ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कापसाळ गावामध्ये दरवर्षी माहे मार्च ते मे-जूनपर्यंत विहिरींचे जलस्त्रोत आटत असल्याने तीव्र पाणीटंचाई जाणवते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कारणास्तव मौजे कापसाळ या गावाचा समावेश निमशहरी भागात करून नव्याने पाणीयोजना राबविण्यात यावी, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) मौजे कापसाळ (ता.चिपळूण, जि. रत्नागिरी) येथे जिल्हा परिषदेमार्फत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत खालीलप्रमाणे ३ नळ पाणी पुरवठा योजना करण्यात आल्या आहेत.

अ) कापसाळ, दुकानखोरी सन २०१४-१५

ब) कापसाळ, फणसवाडी, पायरवाडी सन २०१२-१३

क) कापसाळ, डिगेवाडी सन २०१२-१३

या नळ पाणी पुरवठा योजना पूर्ण असून पाणी पुरवठा व्यवस्थितरित्या सुरु आहे.

तथापि कोकणातील भौगोलिक स्थितीमुळे उन्हाळ्यात विहिरीचे जलस्त्रोत आटतात व टंचाई भासते. जलस्वराज्य टप्पा-२ कार्यक्रमाच्या दि.११.०६.२०१४ च्या शासन निर्णयानुसार निमशहरी गावांच्या निवडीकरिता प्राधान्याने ज्या गावांमध्ये ५ वर्षापेक्षा अधिक जुन्या असलेल्या योजनांचा विचार करावयाचा असल्याने जिल्हयातील नवीन गांवे निवडताना समन्वय समितीच्या बैठकीमध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत सूचविण्यात आलेल्या व जुन्या योजना असलेल्या गावांची निवड करण्यात आली आहे. सदर गावाचा समावेश निम शहरी गावांच्या यादीत करण्यासाठी भविष्यात विचार करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** 
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.